आपत्ती व्यवस्थापन विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र.
दिनांक.

# आदेश

विषय – कोरोना विषाणुमुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश.

संदर्भ- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग ,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मंत्रालय मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५.

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

ज्या अर्थी राज्यात कोरोना विषाणूमुळे (COVID) उद्‌भवन्या संसर्गजन्य आजारामुळे पुणे शहरात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्याअर्थी जागतिक आरोग्य संघटना तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रस्तावित केलेल्या विविध उपाय योजनांची अंमल बजावणी व राज्यात या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव पुणे महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन उपाययोजना लागू करण्याची व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्याची आवशक्यता निर्माण झाली आहे. पुणे शहरातील करोना व्हायरस पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या दिवसेंदिवस अधिक वेगाने वाढत आहे. भारतातील करोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या विचारात घेता, येत्या काळात पुणे शहरात रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पुणेकरांच्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील काही भागांमध्ये पुढील काही दिवस नागरिकांच्या हालचालींवर, बाहेर फिरणाऱ्यावर मर्यादा आणणे आवश्यक झाले आहे.

ज्याअर्थी,अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग ,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,नवीन मंत्रालय मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५. नुसार एखाद्या भौगोलिक क्षेत्र उदाहरणार्थ गाव,तालुका,वार्ड,कॉलनी इत्यादी मध्ये कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव/उद्रेक आढळ्यास अशा उद्रेकजन्य क्षेत्राबाबत खाली नमूद केलेल्या तसेच

प्रसंगानुसार आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणयासाठी संबधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त सक्षम प्राधिकारी असतील.अशा भौगोलिक क्षेत्रांच्या बाबतीत क्र.१० मधील

अ) क्षेत्र प्रतिबंधित करणे.

आ) क्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे.

इ) क्षेत्रातून वाहनांचे आवागमन प्रतिबंधित करणे.

तसेच भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ प्रमाणे संभाव्य होणाऱ्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीविताला धोका निर्माण होण्याचा संभव आहे. याकरिता कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश लागू करण्यात येत आहे.

सबब साथरोग प्रतिबंध अधिनियम १८९७ (एपिडमिक ॲक्ट) मधील तरतुदींनुसार, पुणे शहरातील कोंढवा परिसर, सर्व पेठांचा परिसर (महर्षिनगर ते आरटीओ कार्यालय यादरम्यान) काही पोलिस ठाण्यांच्या अंकित असलेला सोबतच्या नकाशात दर्शविलेला परिसर (परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) आज सोमवार, दि. ०६ एप्रिल २०२० रोजी मध्यरात्री बारा वाजेपासून पुढील आदेशापर्यंत सील करण्यात येत आहे. त्यानुसार सदर परिसरातील संबंधित पोलिस स्टेशन प्रमुख या भागाच्या हद्दी सील करतील. त्यानुसार सदर परिसरांच्या हद्दींमध्ये पुढील आदेशापर्यंत प्रवेशबंदी व परिसरातून बाहेर पडण्यास नागरिकांना बंदी करण्यात येत आहे. सील केलेल्या परिसरातील प्रत्येक नागरिकाला तोंडाला मास्क लावणे बंधनकारक करण्यात येत आहे.

तथापि, १) सदर आदेशामधील निर्बंधातून कृषि उत्पन्न बाजार समितीमधील व्यवहार व तेथील मालाची आवक जावक यांना वगळण्यात येत आहे.

२) सदर परिसरात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींना यामधून वगळण्यात येत आहे.

३) सदर आदेशान्वये कोरोना विषाणू प्रतीबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे पुणे महानगरपालिकेचे सर्व कर्मचारी व वाहने तसेच शासकीय व सेवा देण्यात येणाऱ्या वाहनांना सदरच्या आदेशानुसार वगळण्यात येत आहेत.

पुढील काळात शहरातील रुग्णांची संख्या विचारात घेता टप्प्याटप्प्याने शहरातील इतर भागांत देखील या प्रकारचे निर्बंध लागू करण्याबाबत आवश्यकतेनुसार

निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी किमान सात दिवसांसाठी लागणारे जीवनावश्यक साहित्य गर्दी न करता प्राप्त करून घेऊन पूर्वतयारी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

हा आदेश आज दिनांक ०६ एप्रिल २०२० रोजी माझ्या सही शिक्क्याने दिला आहे.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

सोबत- परिशिष्ट अ (नकाशात दर्शविलेला परिसर)

प्रत –

१) मा.विभागीय आयुक्त ,विभागीय आयुक्त कार्यालय पुणे.
२) मा.पोलीस आयुक्त.पोलीस आयुक्त कार्यालय पुणे.
३) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष ,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.जिल्हा पुणे.

यांचेकडेस माहिती व पुढील आवशयक कार्यवाहीसाठी अग्रेषित.



KOREGAON PARK
PANCHAWATI
Panchwati Garden
BHAGEERATH
SHIVAJINAGAR
MIT World Peace University
Kamala Nehru Park
Sahyadri Super Speciality Hospital
PRABHAKAR SADAN
Kotak Mahindra Bank
Krishna Hospital
KOTHRUD
कोथरूड
MAHAGANESH COLONY
ERANDWANE
एरंडवणे
LOKAMANYA NAGAR
Deenanath Mangeshkar Hospital and Research Centre
Dattawadi Police Station
Shashwat Hospital
Pune-Okayama Friendship Garden
ICICI Bank Karve Nagar Pune - Branch & ATM
Warje Malwadi Police Station
Dr Patil Hospital
Anand Nagar Post Office
Saraswat Bank
Sinhgad Road Police Station
MANIK BAUG
DAMODAR NAGAR
NIRANJAN PARK
VADGAON BUDRUK
Suyog Hospital
BIBWEWADI
बिबवेवाडी
DHANKAWADI
धनकवडी
SHIVRAJ NAGAR
National War Memorial Southern Command
DOBARWADI
Empress Botanical Garden
State Bank of India
Hadapsar I.E Post Office
Southern Command Hospital
New Command Hospital, Pune
MH CTC Pune
WANWADI
वानवडी
SHIVAM
NANAVATI NAGAR
SRPF
RAMTEKDI INDUSTRIAL AREA
DHORVADI
LULLANAGAR
WANOWRIE
BLOCK A
Bank of India
SURYA SOCIETY
India Post
SAIBABA NAGAR
India Post (Mohammed Wadi)
HDFC Bank
The Corinthians Resort and Club Pune
SAI PARK
GANESH NAGAR
DALVI NAGAR
MAGARPATTA
JADHAV NAGAR
Kotak Mahindra Bank
DTDC
Google My Maps



KOREGAON
SOCIETY
KHAIRE VASTI
Sangamwadi Parking - II
Ruby Hall Clinic
DBS Bank
BHAGEERATH
SHIVAJINAGAR
RTO Pune City
Jehangir Hospital
State Bank of India
Model Colony Post Office
Kamla Nehru Hospital
INOX Bund Garden Road
Fergusson College
Pataleshwar Temple
GPO Pune
Pune
पुणे
KEM Hospital
Kamala Nehru Park
Sahyadri Super Speciality Hospital...
BUDHWAR PETH
GAWALIWADA
Gurudwara Guru Nanak Darbar
Sri Ahobila Mutt's Sri Balaji Mandir
ERANDWANE
एरंडवणे
Poona Hospital And Research Centre
LOKAMANYA NAGAR
Ganesh Kala Krida Manch
East St
Artificial Limb Centre
Employees' Provident Fund Organisation
Sarasbaug Ganesh Temple
Dattawadi Police station
Command Hospital Dermatology
New Command Hospital, Pune
LADKATWADI
Dattawadi Police Station
Pune-Okayama Friendship Garden
Pune Adventist Hospital
MH CTC Pune
CTC Main Park
Shraddha Hospital
Market Yard
GULTEKDI
गुलटेकडी
DHORVADI
ESIC SRO Pune Office
LULLANAGAR
BORADE NAGAR
BLOCK A
Anand Nagar Post Office
HDFC Bank
Axis Bank
Sahyadri Hospital Bibwewadi
ICICI Bank Kondhwa Pune - Branch & ATM
DAMODAR NAGAR
दामोदर नगर
MODERN SOCIETY
SAHAKAR NAGAR
India Post
HDFC Bank
Canara Bank
SAIBABA NAGAR
Wadgaon Budruk
Suyog Hospital
BIBWEWADI
बिबवेवाडी
KONDHWA
Google My Maps